NSB- 72

# नांदणी सहकारी बँक लि., नांदणी.

प्रधान कार्यालय : बाजार पेठ, नांदणी. ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

शाखा -

## ए. टी. एम. कार्ड अर्ज

मी / आम्ही, आपले बँकेत असणाऱ्या माझ्या / आमच्या खालील खात्याकरिता ए.टी.एम.मशीन सेवेसाठी अर्ज करीत आहे/आहोत.

### खात्यासंबंधी माहिती

खाते/नं.:- ______________ आयडी नं.- ______________

### * अर्जदाराची माहिती *

खातेदाराचे / पहिले नांव असलेल्या/फर्मचे नांव श्री./मे. : ______________

______________

जन्म तारीख : __ __ ____

आईचे नांव : ______________

ए.टी.एम. कार्डावरील नांव (इंग्रजी मध्ये) : ______________

संपूर्ण पत्ता : ______________

______________

ऑफिस पत्ता : ______________ ई-मेल : ______________

टेलिफोन नं. : ______________ पिन नं. : ______________

मोबाईल (खातेस दिलेला) : ______________

### * डिक्लेरेशन *

मी/आम्ही सदर अर्जाच्या मागे असलेल्या बँकेच्या अटी आणि शर्ती व याबाबतचे नियम वाचले असून ते आम्हाला पुर्णपणे समजले आहेत. मी/आम्ही अटी/शर्ती नियम स्विकारत असून त्या मला/आम्हाला मान्य व कबुल असून त्यास व त्यामध्ये /वेळोवेळी होणाऱ्या भावी बदलास आम्ही बांधील आहोत.

अधिकृत व्यक्तीची सही ______________ तारीख : / /

अधिकृत व्यक्तीची सही ______________ तारीख : / /

(संयुक्त खात्यासाठी सर्व व्यक्तींनी सह्या केल्या पाहिजेत)

### --* बँकेच्या वापराकरिता *--

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| Entry Date | Entry No. | Input user ID | Input User Sign | Authorize ID | Authorize Sign |

Card No. : ______________

Issue Date : __ __ ____

कार्ड पोहोच सही ______________

# नांदणी सहकारी बँक लि., नांदणी.

## ए. टी. एम. कार्डसाठी अटी व नियम

१) खात्यावरील कमीतकमी शिल्लक ए.टी.एम. सवलत घेणाऱ्या ग्राहकाने त्याचे खात्यावर बँकेकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनेनुसार कमीत कमी शिल्लक रक्कम ठेवणे बंधनकारक आहे. सेव्हींग्ज खात्याबाबत सदरची मर्यादा रु. ५००/– व चालू खात्यासाठी रु. १०००/– इतकी राहील. जर मर्यादेपेक्षा कमी रक्कम खात्यावर शिल्लक राहील तर दर पत्रकामध्ये आकार घेतला जाईल.

ग्राहकांनी त्यांचे खातेवरील कमीत कमी शिल्लकेबाबतची मर्यादा राखली पाहिजे. सदरची अट ही ग्राहकांनी ए.टी.एम. कार्डाची सवलत चालू ठेवावयाची किंवा नाही याबाबत महत्वाची आहे. तथापि कोणत्याही प्रकारचे कारण न देता पुढे चालू ठेवणे अथवा काढून घेणेचा सर्वाधिकार बँकेने राखून ठेवला आहे.

२) **पैसे काढण्यासाठी मर्यादा** - ग्राहकांना प्रत्येक दिवशी त्यांचे खातेवरील जमा असलेल्या रक्कमेपैकी रु. ३०,०००/– काढता येतील. तथापि सदरची मर्यादा रक्कम वेळोवेळी ठरविली जाईल. सदरच्या मर्यादेचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन केलेस ए.टी.एम. कार्ड सवलत काढून घेतली जाईल.

३) प्रति खाते/प्रती ग्राहक ए.टी.एम. कार्ड सवलत – ए.टी.एम. कार्ड नवीन रु. ६०/– व डुप्लीकेटसाठी रु. २००/– चार्जेस घेणेत येतील व सर्व्हिस चार्जेस प्रति वर्षी रु. ५०/– प्रमाणे आकारणेत येईल.

४) **जादा उचल केलेल्या खात्याबाबत** - ए.टी.एम. कार्डधारकाने त्याचे खात्यात पुरेशी रक्कम असलेशिवाय पैसे काढू नयेत. खात्यात पुरेशी रक्कम आहे किंवा कसे याची खात्री करणेची जबाबदारी पूर्णपणे ग्राहकाची आहे. सदर कार्डधारकांच्या खातेवर किमान रक्कमेपेक्षा कमी रक्कम शिल्लक राहिल्यास अथवा ओव्हरड्राफ्ट झालेस किंवा कोणत्याही कारणाने येणे राहिलेस ती त्या खात्यावरुन सदरची रक्कम कार्डधारकाच्या खात्यावर जमा करणेचा हक्क बँकेस आहे. अशी रक्कम एक दिवसापेक्षा जादा काळ जमा झाली नाही तर सदर रक्कमेवर द.सा.द.शे. १५ % प्रमाणे व्याज आकारले जाईल. याशिवाय प्रत्येक जादा उचल झालेची घटनेवेळी त्याबाबत बँक वेळोवेळी ठरवेल त्याप्रमाणे दंड आकारला जाईल.

५) **वैयक्तिक ओळख क्रमांक** (PIN) – सर्व ग्राहकांनी ए.टी.एम.चा वापर सुलभ होणेसाठी, त्याचे वैयक्तिक ओळख क्रमांक निवडणे आवश्यक आहे. सदरचा ओळख क्रमांक हा गोपनीय असून., त्यामुळे ए.टी.एम. कार्डाचा वापर फक्त अधिकृत व्यक्तिलाच करता येईल. सदरचा ओळख क्रमांक कोणत्याही व्यक्तिस सांगू नये, किंवा दुसऱ्या कोणत्याही व्यक्तिस सुगावा लागेल अशा ठिकाणी लिहू नये. ओळख क्रमांक उघड करणे किंवा त्याच्या गुप्ततेबद्दलची पुरेशी सुरक्षा याबाबतची संपूर्ण जबाबदारी ग्राहकांची राहील. सदरचे ओळख क्रमांकाने केलेले सर्व व्यवहारांची जबाबदारी ग्राहकांची राहील आणि सदरचे व्यवहाराच्या नोंदी ह्या ग्राहकांवर बंधनकारक राहतील. खातेधारकाकडून PIN गहाळ झालेस नवीन PIN साठी रु. ३०/– चार्जेस आकारण्यात येईल.

६) **संयुक्त खाते** – संयुक्त खात्यावर ए.टी.एम. सवलत वापरुन केलेले सर्व व्यवहार हे सर्व संयुक्त खातेदारांवर वैयक्तिक आणि संयुक्तरित्या बंधनकारक राहतील.

७) **कार्डाची मालकी** – सदरचे कार्ड ही बँकेची मालमत्ता असून, ही सवलत बँक कोणत्याही प्रकारचे कारण न देता काढून घेऊ शकते, रद्द करु शकते. अशा वेळी सदरचे कार्ड बँकेस परत करणेचे बंधन आहे. अशा प्रकारे कार्ड रद्द केले नंतर कार्डाचे शुल्क परत केले जाणार नाही.

८) **कार्ड हरविले/चोरीला गेले बाबत** – जर ग्राहकाचे कार्ड हरविले किंवा चोरिस गेले तर अशावेळी ग्राहकांनी ताबदतोब बँकेस त्याबाबत लेखी कळविले पाहीजे. जर अशा कार्डावरुन कोणत्याही प्रकारचा व्यवहार झालेस आणि जर सदरचे कार्ड हरविलेबाबत किंवा चोरी झाले बाबतची कमीत कमी २४ तास पूर्व लेखी नोटीस व त्या बरोबर ए.टी.एम. कार्ड रद्द करणेबाबतची सूचना दिली नसलेस अशा व्यवहाराची संपूर्ण जबाबदारी खातेदारांचीच राहील. एकदा सदरचे कार्ड हरविले/चोरीस गेले बाबत किंवा खराब झाले बाबत सूचना दिले नंतर ते कार्ड परत सापडले तरी ते पुन्हा वापरता येणार नाही याची दखल ग्राहकांनी घ्यावी.

९) **फी चार्जेस** – सदरचे कार्ड संबंधी बँकेने ठरविलेली फी/चार्जेस रोखीने अगर कार्ड धारकाच्या खात्यात नावे टाकून वसूल केले जातील.

१०) **ए.टी.एम. मशीन** – ए.टी.एम. हे यंत्र असून ते वापरत असताना काही वेळा चुका होण्याची शक्यता असते. ग्राहकाने बँकेस सदर यंत्राच्या वापरामुळे चुका झाल्यास त्याची भरपाई करुन घ्यावी, तसेच तांत्रिक बिघाडीमुळे मशिन बंद पडल्यास होणाऱ्या गैरसोईस बँक जबाबदार राहणार नाही. ए.टी.एम. मशीन यांत्रिक चुकांमुळे/बिघाडा मुळे होणाऱ्या चुकांमुळे पडणारी जबाबदारी तसेच वरील कलम ६ ते ९ मधील उल्लेख केलेल्या ए.टी.एम. च्या अधिकृत व्यवहारातून पडणाऱ्या जबाबदारीतून बँक पूर्णपणे मुक्त आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी ग्राहकांवर बंधनकारक आहे.

११) बँकेचे व्यवहार बंद झाले नंतर पैसे काढणेचे केलेले व्यवहार हे सदर ग्राहकांच्या खात्यावर दुसऱ्या कामकाजाच्या दिवशीच्या तारखेला व्हॅल्यु डेट म्हणून नोंद केली जाते.

१२) कार्ड धारकास कोणत्याही प्रकारे पूर्व सूचना न देता सदर अटी/नियमाचे जादा अटी घालणे/वगळणे किंवा बदलने बाबतचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. ए.टी.एम. कार्ड धारकांनी ए.टी.एम. कार्ड घेतल्या नंतर सदरच्या अटी, शर्ती पूर्णपणे काळजीपूर्वक वाचल्या आहेत व त्यांचेवर बंधनकारक व त्यांना कबूल व मान्य आहेत असे समजण्यात येईल.

१३) ए.टी.एम. कार्डाची मुदत ५ वर्षे राहील.

१४) जर ग्राहकाच्या खात्यावर कोणतेही अनधिकृत व्यवहार दृष्टीक्षेपास ग्राहकास आल्यास त्या ग्राहकाने सदर बाबतची लेखी सूचना बँकेस त्वरीत देणे अवश्यक आहे.

१५) ए.टी.एम. मशीन मधून कार्ड व्दारे दिलेली आज्ञा (Command) रद्द वा स्थगित करणेचा अधिकार कार्डधारकास नाही.

१६) कार्डधारकाने स्वतःच धोका/अफरातफर, जाणतेपणी वा आक्षम्य निष्काळजीपणा केलेला असल्यास अशा बाबतीत सदरची रक्कम कार्डधारकाकडून राहील.

१७) सदरची सवलत ही संयुक्तरित्या अधिकाराने व्यवहार करणेच्या, भागीदारी फर्म किंवा इतर कोणतीही बॉडी कार्पोरेट आणि अज्ञानाचे नांवाने इ. संयुक्त खात्यासाठी दिली जाणार नाही तथापि दोघांचे नांवाने असलेल्या संयुक्त खात्यास ए.टी.एम. कार्ड हे पहिले नांव असणाऱ्या खातेधारकास दिले जाईल.

**कार्डधारकाची सही**